# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ४१) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०१ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा राजीनामा; चंपई सोरेन नवे मुख्यमंत्री

रांची दि.३१ (वृत्तसंस्था)- झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी राजीनामा दिला असून चंपाई सोरेन हे नवीन मुख्यमंत्री असतील. आमदारांच्या बैठकीत त्यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. चंपाई सोरेन हे हेमंत सोरेन यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. जमिनी घोटाळ्याप्रकरणी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची ईडीकडून चौकशी करण्यात आली असून हेमंत सोरेन यांना अटक होण्याची दाट शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर हेमंत सोरेन यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. चंपई सोरेन हे झारखंडचे नवे मुख्यमंत्री होणार असून थोड्याच वेळात राज्यपाल त्यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देतील. तर कोणत्याही क्षणी हेमंत सोरेन यांना ईडीकडून अटक होण्याची शक्यता आहे. हेमंत सोरेन यांनी राजभवन गाठून राज्यपालांकडे राजीनामा सुपूर्द केला. याआधी हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन यांचे नाव मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत होते. मात्र कुटुंबातून विरोधाचा आवाज उठवला जात होता. दरम्यान, जेएमएम, काँग्रेस आणि आरजेडी विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत चंपाई सोरेन यांची नेतेपदी निवड करण्यात आली आहे. चंपाई सोरेन हे सरायकेला मतदारसंघाचे आमदार आहेत असून सध्या परिवहन, अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती आणि मागासवर्गीय कल्याण मंत्री आहेत. ते झारखंड मुक्ती मोर्चाचे उपाध्यक्षही आहेत.

## 'सगेसोयरे' अध्यादेशाविरोधात ओबीसी संघटनांकडून न्यायालयात याचिका दाखल

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- सरकराने मराठा आरक्षणाबाबत काढलेल्या अध्यादेशाला मुंबई उच्च न्यायालयात ओबीसी संघटनांकडून आव्हान देण्यात आले आहे. या अध्यादेशातील 'सागेसोयरे' आणि 'गणगोत' यांच्या प्रतिज्ञा पत्राद्वारे कुणबी दाखले देण्यासाठी काढण्यात आलेल्या २६ जानेवारीच्या मसुद्यावर आक्षेप घेत ओबीसी संघटनांनी न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षणाचा मुद्दा आणखीच तापण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकराने मराठा आरक्षणाबाबत एक अध्यादेश काढला आहे. यासाठी १५ दिवसांत हरकती दाखल करण्यासाठी देखील मुदत देण्यात आली आहे. दरम्यान, या अध्यादेशात 'सागेसोयरे' आणि 'गणगोत' यांच्या प्रतिज्ञा पत्राद्वारे कुणबी दाखले देण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. यावरच ओबीसी संघटनांनी आक्षेप घेत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ओबीसी वेलफेयर फौंडेशन तर्फे ॲड. मंगेश ससाणे यांनी मुंबई उच्चं न्यायालयात याचिका दाखल केली आहे. संविधानाच्या विरोधात जाऊन सगेसोयरेची व्याख्या बदलण्यात येऊ नये अशी याचिकेच्या माध्यमांतून भूमिका मांडण्यात आली आहे. त्यामुळे आता न्यायालयाकडून यावर काय निकाल दिला जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.

## भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था-राष्ट्रपती

### मागील दहा वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आल्याचा दावा

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या उद्या म्हणजे १ फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यापूर्वी आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला औपचारिकपणे सुरुवात झाली. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेत अर्थसंकल्पासंदर्भात खासदारांना संबोधीत केलं. मागील वर्ष भारतीय अर्थव्यवस्थेसाठी चांगले गेले आहे. भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. तसेच गेल्या १० वर्षात २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचेही त्या म्हणाल्या. जम्मू-काश्मीरमधील आरक्षणामुळं राज्याच्या विकासाला गती मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

कोणताही देश तेव्हाच प्रगती करतो जेव्हा तो तरुणांच्या क्षमतेचा पुरेपूर फायदा घेतो असेही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. भारतातील लोकांना राम मंदिर उभारणीची वर्षानुवर्षे अपेक्षा होती आणि आता हे स्वप्न पूर्ण झाले आहे. तसेच जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्याबाबत शंका व्यक्त केल्या जात होत्या, मात्र, ते देखील हटवण्याचा निर्णय झाल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. संसदेने तिहेरी तलाकविरोधात कायदा केला आहे. याच संसदेने शेजारी देशातून येणाऱ्या अत्याचारित नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्याचा कायदा केला आहे. तसेच सरकारने मिशन मोडवर लाखो नोकऱ्या दिल्या आहेत.



वन रँक वन पेन्शनची तरतूद केली आहे. भारतीय लष्करात प्रथमच चीफ ऑफ डिफेन्स स्टाफची नियुक्ती करण्यात आल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. आमच्या सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर आले आहेत. २५ कोटी लोकांची गरिबी दूर झाली असून देशातील उर्वरित लोकांसाठी हा आशेचा किरण असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटले आहे. त्यामुळं सध्या भारत योग्य दिशेने वाटचाल करत आहे. तसेच सरकार योग्य निर्णय घेत असल्यानं आत्मविश्वास वाढत असल्याचे राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्या १० वर्षांत आपण भारताला पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये सामील झाला आहे. भारताची निर्यात सुमारे ४५० अब्ज डॉलरवरुन ७७५ बिलियन डॉलरपेक्षा जास्त झाली असल्याचे राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. एफडीआय पूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाला आहे, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची विक्री चार पटीने वाढली असल्याचा उल्लेख देखील राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात केला आहे.

## आमदार अनिल बाबर अनंतात विलीन

सांगली दि.३१ (प्रतिनिधी)- सांगली जिल्ह्यातील जत आटपाडी खानापूरचे आमदार अनिल बाबर यांना हजारोंच्या उपस्थितीत अखेरचा निरोप देण्यात आला. अनिल बाबर यांना न्यूमोनिया झाल्यानंतर सांगलीत उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान आज (३१ जानेवारी) त्यांची प्राणज्योत मालवली. निधनानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी पोहोचत आमदार अनिल बाबर यांच्या कुटुबीयांचे सांत्वन केले. आमदार अनिल बाबर यांच्या निधनाने विटा खानापूर-आटपाडी मतदार संघावर शोककळा पसरली आहे.

## हिंमत असेल तर मंडल आयोगाला आव्हान द्या-भुजबळ

### सरकार झुंडशाहीपुढे झुकल्याचा आरोप

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- झुंडशाहीपुढे नमते घेऊन लाखो लोकांना ओबीसी आरक्षणात बॅकडोअर एंट्री दिली जात आहे. पुन्हा त्यांचे सगेसोयऱ्यांच सुरु झाले आहे. त्यामुळे आम्हाला आमदार, खासदार, प्रशासन आणि कोर्टाकडे दाद मागावी लागणार आहे. लोकशाहीने आम्हाला जे अधिकार दिले आहेत, त्याचा आम्ही वापर करणार आहोत, असे अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मराठा समाजाचे जे माहितीगार आहेत, अभ्यासक आहेत.. ते म्हणतायत की, आम्हाला मराठा म्हणून वेगळे आरक्षण द्या. परंतु सध्या झुंडशाहीपुढे नमते घेऊन निर्णय घेतले जात आहेत. आमच्या आरक्षणाला धक्का लागला जावू नये. ते एका जातीसाठी लढत आहेत, मी मात्र ३७४ जातींसाठी लढत आहे.

मंत्री छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले, त्यांच्याएवढा (मनोज जरांगे) ज्ञानी हिंदुस्थानात दुसरा कोणी आहे का? तीन कोटी लोक मुंबईत आणणार होते.. बघितले सगळ्यांनी



वाशीमध्ये. ज्याला लाख म्हणजे काय अन् कोटी म्हणजे काय, हे कळत नाही. तेच आता देशामध्ये मंडल आयोगाला विरोध करणार आहेत. त्यांच्यात हिंमत असेल तर मंडल आयोगाच्या विरोधात आवाज द्यावा, माझे त्यांना आव्हान आहे. गावागावात तीन-चार दिवसांपासून उन्मादी उत्सव सुरु आहे. (पान ४ वर)

## आम्ही झुंडशाहीने वागत नसून हक्क मागत आहोत-मनोज जरांगे

पुणे दि.३१ (प्रतिनिधी)- मराठा मुलानी सांगितले की आम्ही मुंबईला जाताना आरक्षण घेऊन येऊ त्याप्रमाणे आम्ही घेऊन आलो आहे. कायद्यामार्फत सगेसोयरे प्रमाणपत्र मिळाले की पुन्हा एक महादिवाळी साजरी केली जाणार आहे. तसेच एक मोठी जाहिर सभा घेतली जाणार आहे. आमच्या ज्या कुणबी नोंदी मिळाल्या त्या चॅलेंज होऊ शकणार नाही. राजकीय आरक्षणा बाबत अद्याप मला कोणी विचारले नाही. तो उद्देश धरून माझे आंदोलन नाही. ज्या सवलती ओबीसी यांना मिळत आहेत, त्या आम्हाला मिळाव्या हीच अपेक्षा आहे. आम्ही झुंडशाहीने वागत नसून हक्क मागत आहोत, असे मनोज जरांगे म्हणाले. त्यांनी पुणे श्रमिक पत्रकार संघात पत्रकारांशी संवाद साधला.

जरांगे म्हणाले, मी प्रथम नेतृत्व हातात घेतले नाही मला नेतृत्व नको होते. पण आंदोलन प्रामाणिक केले पाहिजे अशी भावना होती. विनाकारण पैसे गोळा करण्यात मी कधी पडलो नाही. मला राजकारणाचा वारसा नाही. मी शेतकरी कुटुंबातील आहे. येवल्याचा माणूस म्हणाला मी पाचवी शिकलेलो आहे. सरकारने माझी सर्व माहिती काढली. मी बारावी शिकलो आहे आणि मी खूप पुस्तके



वाचली नाही. पण अनेक वर्ष रोज लोकांचे प्रश्न हाताळत गेलो. मी बारीक दिसत असल्याने कोण माझ्यावर विश्वास ठेवत नाही. २९ ऑगस्ट रोजी मी मराठवाडा मधील लोकांना एकत्र करून अडीच लाख लोकांचे आंदोलन केले.

माझ्या गावातील लोकांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. अनेक जन गंभीर जखमी झाले. शांततेत आमरण उपोषण आंदोलन केल्याने अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. पोलिस आणि प्रशासन यांनी मला विनंती केल्यावर मी समाजाला सांगितले आणि शांततेत लोक घरी गेले. त्यानंतर पोलिसांनी ज्या प्रकारे लाठीमार, गोळीबार केला त्यामुळे अमानुष प्रकार कधी बघितला नाही. मी १२ दिवस बिना पाणी, अन्न राहू शकतो. उपचार घेतो मी म्हणालो तरी त्यानंतर मोठ्या प्रमाणत पोलिस फोर्स आणून आंतरवली मध्ये अचानक लाठीमार केला गेला हा सर्वात मोठा डाग आहे.

## ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात हिंदूंना पूजा करता येणार; न्यायालयाचे निर्देश

वाराणसी दि.३१ (वृत्तसंस्था)- वाराणसी न्यायालयाने बुधवारी हिंदू भाविकांना ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात प्रार्थना – पूजा करण्याचा अधिकार बहाल केला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार हिंदू भाविक 'व्यासाचे तळघर' (व्यास का तेखाना) मध्ये पूजा करू शकतात. सध्या मशिदीतील हा भाग बंद ठेवला गेलेला आहे. जिल्हा प्रशासनाने पुढील सात दिवसांत हिंदूंना त्याठिकाणी पूजाअर्चा करण्याची व्यवस्था करून द्यावी, असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

या निकालानंतर हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, व्यासाचे तळघर येथे हिंदूंना पूजाअर्चा करण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. आता जिल्हा प्रशासनाने सात दिवसांच्या आत तिथे व्यवस्था करून द्यावी, जेणेकरून तिथे प्रत्येकाला पूजा करण्याची संधी मिळेल. यानिर्णयानंतर हिंदू पक्षकारांनी न्यायालयाबाहेर आनंद व्यक्त केला.

## शरद पवार राष्ट्रवादीचे सदस्य नाहीत, मग अध्यक्ष कसे होतील?; अजित पवार गटाचा युक्तिवाद

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार अपात्रता प्रकरणी लोकसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सुनावणी झाली. या सुनावणीत अजित पवार गटाच्या वकिलांनी आज महत्त्वाचा युक्तिवाद केला. पक्षाच्या घटनेनुसार शरद पवार हे पक्षाचे सदस्य नाहीत मग अध्यक्ष कसे होऊ शकतात? असा सवाल अजित गटाचे वकील विरेंद्र तुळजापूरकर यांनी केला.

सुनावणीत युक्तिवाद करताना वकील तुळजापूरकर म्हणाले की, राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड घटनेनुसार झालेली नाही. शरद पवारांसह पटेल, तटकरे यांची नेमणूक निवडणूक न घेता झाली नाही. घटनेनुसार शरद पवार हे पक्षाचे सदस्य नाहीत मग अध्यक्ष कसे होऊ शकतात? असा सवाल त्यांनी उपस्थित करत निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तर विधिमंडळात किती बहुमताला सर्वाधिक महत्व आहे, यावरही त्यांनी लक्ष वेधले.

तुळजापूरकर यांनी युक्तिवाद करताना म्हटले की, घटना नेमकं काय आहे याकडे लक्ष दिलं पाहिजे. पार्टीमध्ये बहुमत असेल तर मग ते पार्टीच्या स्ट्रक्चर नुसार असले पाहिजे आणि दुसरं म्हणजे विधिमंडळ बहुमत बघायला हवं.

ऑर्गन्यजेशन स्ट्राक्चरमध्ये किती बहुमत आहे हे देखील बघितलं पाहिजे. त्यांच्याकडून विधिमंडळ पक्षाचं बहुमत सिद्ध करता आलं नाही. १५ सप्टेंबर रोजी घोषणा केली की शरद पवार यांनी कार्यकारिणी जाहीर केली आणि इतर पदंदेखील जाहीर केली. घटनेनुसार त्यांना ही पदं जाहीर करणं बरोबर आहे का? ते या पार्टीचे मेंबर आहेत का? आणि जर नसतील मग ते अध्यक्ष कसे होऊ शकतात?

## केजरीवाल यांना ईडीचे पाचव्यांदा समन्स

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना केंद्रीय तपास यंत्रणा ईडीने पाचव्यांदा समन्स बजावलं आहे. यापूर्वी, चार समन्समध्ये सीएम केजरीवाल एजन्सीसमोर हजर झाले नव्हते आणि यामागे राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप त्यांनी केला होता. आता पाचव्यांदा समन्स बजावत केजरीवाल यांना २ फेब्रुवारी रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितलं आहे. याच प्रकरणात दिल्लीचे मंत्री मनीष सिसोदिया, आपचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना अटक करण्यात आली आहे.

## राज्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. भारतीय पोलीस सेवा (घ्इए) आणि राज्य पोलीस सेवेतील ४४ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश सरकारकडून जारी करण्यात आले आहेत. पुणे शहर पोलीस आयुक्त रितेश कुमार यांना बढती देण्यात आली असून त्यांच्याकडे होमगार्डचे महासमादेश म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. नागपूर शहराचे पोलीस आयुक्त असणारे अमितेश कुमार हे आता पुणे शहराचे नवे पोलीस आयुक्त असणार आहेत.

वाहतूक विभागाचे अपर पोलीस महासंचालक रविंद्र कुमार सिंघल हे नागपूर शहराचे पोलीस आयुक्त असणार आहेत. गडचिरोली विभागाचे पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांना बढती देण्यात आली असून नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अजयकुमार बन्सल जालना जिल्ह्याचे नवीन पोलीस अधीक्षक असणार आहेत. यापूर्वी अजय कुमार बन्सल मुंबई विभागाचे पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते.

## परमबीर सिंह यांना सीबीआयकडून क्लीन चिट, खंडणीप्रकरणीचा तपास बंद केला

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- माजी मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांना सीबीआयकडून क्लीन चीट मिळाली आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करुन खळबळ माजवून देणारे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्यासह इतरांविरुद्ध धमकावून खंडणी मागितल्याप्रकरणी ठाण्यातील कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्ह्याचा तपास आता बंद करण्याचा अहवाल केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

आपल्या मालकीचा भूखंड बळकावण्यासाठी धमकावणे आणि दोन कोटींची खंडणी वसूल केल्याप्रकरणी व्यावसायिक शरद अग्रवाल यांनी परमबीर सिंग आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. सिंग यांच्या व्यतिरिक्त उपायुक्त पराग मणेरे, संजय पुनमिया, सुनील जैन, मनोज घोटकर यांच्याविरुद्ध कोपरी पोलीस ठाण्यात धमकावणे आणि खंडणीप्रकरणी जुलै २०२१ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात पुनमिया आणि जैन यांना अटक झाली होती. मात्र सिंग यांच्यासह इतरांना अटक करण्यात आली नव्हती.

मात्र २४ मार्च २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल देते वेळी सिंग यांच्या विरोधातील पाचही एफआयआर सीबीआयकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. तसेच त्यांना अटकेपासून संरक्षण देखील दिले होते. या प्रकरणी सीबीआयने ठाण्याच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करुन तपास बंद करण्याची परवानगी मागितली आहे.

## मराठा-ओबीसी आरक्षणावर प्रतिक्रिया देऊ नका; अजित पवारांकडून आमदारांना सूचना

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. दोन्ही बाजूने आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे आगामी लोकसभा-विधानसभा निवडणुका लक्षात घेता आरक्षणाच्या मुद्यावरून राजकीय पक्षांनी देखील सावध भूमिका घेतली असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, मराठा-ओबीसी आरक्षणावर प्रतिक्रिया देऊ नका अशा सूचनाच उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आपल्या राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवार गटाच्या आमदारांची एक बैठक



आयोजित करण्यात आली होती, यावेळी बोलतांना अजित पवारांनी या सूचना दिल्या आहेत.

अजित पवार यांच्या देवगिरी निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीत मराठा ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा झाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवारांनी ओबीसी किंवा मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने आमदारांना कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया (पान ४ वर)

## वंचितचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही; प्रकाश आंबेडकरांचे वक्तव्य

अकोला दि.३१ (प्रतिनिधी)- महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीला समाविष्ट करून घेण्यात आल्याच्या बातम्या नुकत्याच प्रसिद्ध झाल्या होत्या. मंगळवारी (३० जानेवारी) मुंबईतील ट्रायडंट हॉटेलमध्ये झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचितला मविआत घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचा दावा अनेक वृत्तवाहिन्यांनी केला होता. तसेच महाविकास आघाडीने अधिकृत पत्रक जारी करून वंचितला मविआत सहभागी करून घेतल्याचं जाहीर केलं होतं. या पत्रकावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. परंतु, वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही, असं वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केलं आहे.

प्रकाश आंबेडकर यांची अकोला येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी वंचितच्या मविआतील समावेशाबाबत त्यांची भूमिका स्पष्ट केली. प्रकाश आंबेडकर म्हणाले, अद्याप वंचितचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही. कारण वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत (पान ४ वर)

## राहुल गांधींच्या कारवर दगडफेक

कोलकाता दि.३१ (वृत्तसंस्था)- काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील 'भारत जोडो न्याय यात्रा' बिहारमधून पुन्हा पश्चिम बंगालमध्ये दाखल झाली. यादरम्यान बुधवारी (दि.३१) पश्चिम बंगालमधील मालदाच्या हरिश्चंद्रपूर भागात राहुल यांच्या कारवर हल्ला झाला. या घटनेत राहुल यांच्या गाडीवर दगडफेकही करण्यात आली. सुदैवाने त्यांना काही झाले नाही, पण कारच्या काचा फोडण्यात आल्या. या घटनेनंतर ते बसमध्ये बसून निघून पुढे गेले.

मिळालेल्या माहितीनुसार, बिहार-पश्चिम बंगालच्या सीमेवर भारत जोडो न्याय यात्रेत राहुल गांधींच्या कारवर दगडफेक करण्यात आली. काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी तृणमूलवर हल्ला केल्याचा आरोप केला आहे. या घटनेत वाहनाच्या मागील खिडकीची काच फुटली आहे. सुदैवाने राहुल गांधींना दुखापत झाली नाही. जमावातून कोणीतरी मागून दगडफेक केली. घटना मोठी नाही, काहीही होऊ शकले असते, असे अधीर रंजन म्हणाले. (पान ४ व)

# हवामान बदलाची कारणे व उपाययोजना

**जगातील १०० राज्यांना हवामान बदलांमुळे उद्धवणाऱ्या संकटांचा सर्वाधिक धोका आहे. त्यामध्ये महाराष्ट्रासह देशातील महत्त्वाच्या चौदा राज्यांचा समावेश आहे. 'ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क' या अहवालात म्हटले आहे की, हवामान बदलाचे आघात चीन, अमेरिका व भारत ह्या देशांना अधिक सोसावे लागतात.**

**नैसर्गिक आपत्ती म्हणजे नदीची पातळी वाढून पूर येणे, वेगाने वारे वाहून जंगलामध्ये आग लागणे, दुष्काळाची परिस्थिती उद्धवणे, रोगराई पसरणे इत्यादी असू शकतात. वरील अहवालात पर्यावरणातील माहितीप्रमाणे २०५० पर्यंतचे नुकसान मोजण्यात आले आहे. त्यानुसार भारतात आसाममध्ये सर्वात जास्त नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

**भारतात ज्या ठिकाणी सर्वात अधिक रोजगार उपलब्ध होतो किंवा आर्थिक उलाढाली होतात अशा शहरांना अधिक नुकसान सोसावे लागेल, अशी शक्यता आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजेच भारताची आर्थिक राजधानी मुंबई होय; परंतु भारताच्या आर्थिक उलाढाली पाहता मुंबईची तुलना अनेक वेळा अमेरिकेची राजधानी न्यूयॉर्क आणि जर्मनीची राजधानी बर्लिनबरोबर करण्यात येते. या अहवालानुसार भारतात बिहार व आसाम या राज्यांना अधिक नुकसान सोसावे लागणार आहे. कारण, इथे विकासकामांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव दैनंदिन जीवनात जाणवतो. महाराष्ट्रात मुंबईसह ११ जिल्ह्यांमध्ये हवामान बदलाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. अन् २०५० सालापर्यंत पृथ्वीच्या तापमानात १.५ डिग्री सेल्सिअसने वाढ होणे अपेक्षित आहे. २०२३ सालामध्ये उष्णतेचे प्रमाण अर्थातच २०२२ पेक्षा अधिक असेल; परंतु इंटर गव्हर्मेंटल पॅनल ऑन क्लाइमेट चेंज (आयपीसीसी) यांनी दिलेल्या निष्कर्षानुसार आपल्याला येणाऱ्या हवामान बदलांची तयारी करण्याकरता १५ ते २० वर्षांचा अवधी आहे. योग्य पावले उचलून आणि खबरदारी घेऊन आपण हवामान बदलाचे दुष्परिणाम नक्कीच कमी करू शकतो. 'ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क' या अहवालात पूर परिस्थिती, पाण्याचा अभाव, दुष्काळ किंवा वादळामुळे शहरातील इमारतींचे राहण्यासाठी बनवलेल्या घरांचे व कारखाने आणि कचऱ्यांचे होणारे नुकसान याविषयी सखोल विचार करण्यात आला आहे. अशा विषम हवामानामुळे अनेक वेळा रोगराई पसरते, जीवितहानी होते किंवा लोकांना रोजगार मिळेनासे होतात व त्यामुळे लोकांच्या जीवनावर भीषण परिणाम होतो. शहरी व ग्रामीण भागात जैवविविधतेचा नाश होतो आणि निसर्गाचा तोल ढासळतो.**

**हवामान बदलाचा सामना करण्यासाठी हरित व नील स्थापत्यशैलीचा वापर शहरात करणे गरजेचे आहे. शहरी शेती व वृक्षारोपण करण्याकडे लोकांचा कल असावा. तसेच नैसर्गिक स्वरूपात उपलब्ध असलेली सौरऊर्जा, नैसर्गिक जलस्त्रोत, जलप्रपातांमुळे निर्माण होणारी ऊर्जा यांचा वापर अधिक केल्यास उत्तम. कारण नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिकदृष्ट्या उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र शेती करणाऱ्या व्यावसायिकांच्या जीडीपीची घसरण होते. त्यामुळे रोजगाराचा अभाव निर्माण होतो व गुन्हेगारी वाढते. मानवाने अनेक नैसर्गिक अधिवासांचे शहरीकरण करण्यास सुरुवात केलेली आहे हे प्रमुख कारण नैसर्गिक आपत्तींचे देता येईल. औद्योगिक क्रांती पूर्वीच मानवाने विशाल जंगलं असलेल्या जमिनींचे शेती करण्यासाठी वापर करणे सुरू केले. आज अशी परिस्थिती आहे की, थोडीफारच जंगले शिल्लक आहेत व ती जंगले वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरण वाचवताना विकासकामांमध्ये अडथळा येऊ शकत नाही; परंतु विकासकामे अशी करावीत जेणेकरून पर्यावरणाला हानी होणार नाही. प्रशासकीय इच्छाशक्तीची गरज पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आहेत; परंतु प्रत्येकाने आपापल्या परीने लहानसे बदल आयुष्यात केले तरीही आपण पर्यावरणाची बरीचशी हानी टाळू शकतो. उदाहरणार्थ मुंबईसारख्या शहरात बस किंवा ट्रेनने प्रवास करणे, स्वतःची गाडी कमी वापरणे, आपल्या आजूबाजूच्या परिसरात झाडे लावणे, उन्हाळ्यात एसीचे तापमान नेहमीपेक्षा एक किंवा दोन डिग्रीने वाढवणे, खरेदी करताना प्लास्टिकच्या पिशव्या नाकारणे किंवा कोणतेही रबर थर्माकोल व इतर प्रकारचे जास्त पॅकेजिंग नाकारणे यानेही बदल घडू शकतात. भारताचा छोटा शेजारी भूतान हा देश अतिशय पर्यावरणपूरक असून आपणसुद्धा त्याचे उदाहरण नजरेसमोर ठेवणे गरजेचे आहे.**

## शांतीगिरी महाराज नाशिक लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरी महाराज यांना नाशिक लोकसभा निवडणुकीत उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देशभक्ती व राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी महाराज निवडणूक लढवणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत जय बाबाजी परिवाराचे प्रवक्ते विष्णू महाराज यांनी दिली. नाशिक मतदारसंघात जय बाबाजी भक्त परिवाराची संख्या २ लाखांहून अधिक आहे.

२००९ च्या लोकसभा निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातून शांतीगिरी महाराजांनी अपक्ष निवडणूक लढवली होती. त्या वेळी १,४८,०२६ (२०.२५%) मते घेऊन महाराज तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. विजयी उमेदवार शिवसेनेचे चंद्रकांत खैरे यांना २,५५,८९६ मते (३५%) मिळाली होती. सन २०१४ मध्येही त्यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याचे जाहीर केले होते, परंतु शिवसेना-भाजप नेत्यांनी मतदारांनी मनधरणी करून त्यांना निर्णय बदलण्यास भाग पाडले होते.

# नितीश कुमार आवडे सर्वांना...

**बिहारचे** मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी रविवारी सकाळी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे जाऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. काँग्रेस-राजद बरोबर असलेले आपले सरकार आता संपले असे त्यांनी राजभवनावर पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. त्याच दिवशी दुपारी भाजपाच्या ७८ आणि हिंदुस्तानी आवाम मोर्चाच्या आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांना देऊन नवीन सरकार स्थापन करण्याचा दावा केला आणि सायंकाळी भाजपाच्या दोन उपमुख्यमंत्र्यांसह स्वत: बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नवव्यांदा शपथ घेतली. विशेष म्हणजे एकाच टर्ममध्ये त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेऊन देशात विक्रम नोंदवला. एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणून नऊ वेळा शपथ घेणे हासुद्धा त्यांनी उच्चांक निर्माण केला.

नितीश कुमार यांना संधिसाधू म्हणा किंवा पलटूराम. त्यांनी कधी काँग्रेस आणि राजद, तर कधी भाजपा यांना बरोबर घेऊन सरकार स्थापन केले. सरकार कोणत्याही राजकीय पक्षांबरोबर असले तरी मुख्यमंत्री स्वत: नितीश कुमार कायम राहिले. पाटण्यातील मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मात्र त्यांची कायम आहे. बिहारच्या राजकारणात ही मालिका गेली वीस वर्षे चालू आहे. नितीश कुमार स्वार्थी आहेत, केवळ स्वत:साठी ते राजकारण खेळतात, विकासापेक्षा त्यांना मुख्यमंत्रीपदाचा मोह अधिक आहे, हे सर्व मान्य केले तरी सतत इकडून तिकडे जाणारे नि विचार बदलणारे नितीश कुमार हे राजद-काँग्रेसला आणि भाजपाला मुख्यमंत्री म्हणून कसे चालतात? हेच मोठे गूढ आहे. नितीश कुमार बिहार की मजबुरी हैं, हे भाग्य देशातील कोणत्याही मुख्यमंत्र्याला लाभले नसावे...

लोकसभा निवडणुका तीन महिन्यांवर आलेल्या असताना बिहारमध्ये मुख्यमंत्री व त्यांचा पक्षच आपल्याकडे ओढायचा हा भाजपाचा मास्ट्ररस्ट्रोक आहे की नाही, हे काळच ठरवेल. पण बहुमताचे सरकार स्वत: पाडून नितीश कुमार भाजपाप्रणीत एनडीएच्या तंबूत परतले तेही मुख्यमंत्रीपदाचा मुकुट मस्तकावर कायम ठेवून, यामुळे इंडियातील घटक पक्ष चक्रावून गेले आहेत. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा बिहारच्या जवळ आली असतानाच काँग्रेसचा सहभाग असलेले सरकार स्वत: मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीच पाडले, हा राहुल यांच्या यात्रेला झालेला अपशकूनच आहे. राजद व काँग्रेसबरोबर नितीश कुमार यांनी काडीमोड घेतलाच. पण इंडिया या भाजपाच्या विरोधकांच्या आघाडीलाही रामराम करीत ते भाजपाच्या कुशीत जाऊन बसले. असे काय घडले की, महाआघाडी सरकारचा राजीनामा द्यावा लागला, असे पत्रकारांनी त्यांना खोदून खोदून विचारले, तेव्हा नितीश कुमार यांनी – 'काम करने में दिक्कत हो रही हैं', असे बिहारीछाप उत्तर दिले. एकीकडे जनता दल युनायटेड या पक्षाचे अध्यक्षपद नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वीच स्वत:कडे खेचून घेतले व त्या पदावरून ललन सिंह यांना हटवले. आता पक्षाचे अध्यक्षपद व राज्याचे मुख्यमंत्रीपद त्यांच्याकडे आहे आणि भाजपासारखा शक्तिशाली राष्ट्रीय पक्ष त्यांच्या पाठीशी आहे. काँग्रेस-राजदबरोबर नितीश कुमार यांना सुरक्षित वाटत नव्हते. त्यांना स्वत:च्या भविष्याची काळजी जास्त वाटत होती, म्हणूनच एनडीएमध्ये घरवापसी करण्याचा निर्णय झट की पट त्यांनी घेतला.

नितीश कुमार हे एका रात्रीत एनडीमध्ये परतलेले नाहीत किंवा भाजपाबरोबर पुन्हा घरोबा करण्याचा निर्णय त्यांनी अचानक घेतलेला नाही. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा तसेच बिहारचे भाजपाचे प्रभारी विनोद तावडे यांची कूटनिती यशस्वी ठरली व लोकसभा निवडणुकीच्या अगोदर व इंडियामध्ये जागावाटप होण्यापूर्वी नितीश कुमार आपल्या आमदार-खासदारांचा फौजफाटा घेऊन एनडीएमध्ये सामील झाले. जनता दल युनायटेडचे मुख्य प्रवक्ते व नितीश कुमार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे के. सी. त्यागी यांनीही नितीश कुमार यांना भाजपाकडे वळविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जनता दल युनायटेडचे १६ खासदार आहेत. बिहारमधून भाजपचे १७ खासदार निवडून आले आहेत. या राज्यातून ४० पैकी ३९ खासदार हे एनडीएचे आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला ४०० पेक्षा जास्त खासदार निवडून आणायचे आहेत, त्यासाठी बिहारमधील जागा महत्त्वाच्या आहेत. जनता दल यू व भाजपा यांची युती झाल्यामुळे बिहारमध्ये २०१९ च्या लोकसभा निकालाची यावेळी पुनरावृत्ती होऊ शकते.



नितीश कुमार यांनी काँग्रेस-राजदला बरोबर घेऊन बिहारमध्ये सरकार स्थापन केल्यावर, 'मर जाना कबूल है, उनके साथ जाना कबूल नहीं हैं', असे भाजपाबाबत म्हटले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही, 'नितीश के लिए भाजपा के दरवाजे हमेशा के लिए बंद', असा खणखणीत इशारा दिला होता. जातीवादाचे विष पसरविणाऱ्या नितीश यांना भाजपा कधीच घेणार नाही, असेही म्हटले होते.

पण नितीश कुमार यांच्या एनडीए वापसीनंतर भाजपाने त्यांचे स्वागत केले आहे, जनता दल यू हा आपला नैसर्गिक मित्र असल्याचे म्हटले आहे.

बिहारमधील जात गणनेचे शिल्पकार ही नितीश कुमार यांची देशाला नवीन ओळख आहे. केंद्रातून भाजपा सरकार येत्या लोकसभा निवडणुकीत हटविण्यासाठी त्यांनीच विरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. जून २०२३ मध्ये पाटणा येथे भाजपाच्या विरोधात दोन डझन राजकीय पक्षांच्या प्रमुखांची बैठक त्यांनी घेतली व त्यातून इंडिया आघाडी स्थापनेची कल्पना पुढे आली. भाजपाच्या हिंदुत्वाच्या प्रचाराला विरोध करण्यासाठी सामाजिक न्याय हे शस्त्र प्रभावीपणे वापरायचे ही कल्पना नितीश कुमार यांचीच होती. पण त्यांनीच भाजपाच्या छावणीत अकस्मात उडी मारल्यामुळे ते शस्त्र बाहेर काढण्याअगोदरच बोथट झाले.

बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्याच्या घटनेनंतर १९९३ मध्ये उत्तर प्रदेशात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुलायमसिंह यादव व मायावती यांनी एकत्र येऊन निवडणूक लढवली होती. भाजपाला मतविभाजनाचा लाभ मिळू नये यासाठी माया-मुलायम एकत्र आले होते. तोच प्रयोग २०२४च्या लोकसभा निवडणुकीत एकास एक उमेदवार देऊन करण्याचे इंडिया आघाडीने ठरवले. पण माघार कुणी घ्यायची यावर सारे गाडे अडले. ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल यांनी स्वबळावर लढण्याचे जाहीर केले. इंडिया आघाडीचे करविते नितीश कुमार, तर भाजपाच्या वळचणीस जाऊन बसलेत. अखिलेश यादव यांनी काँग्रेसला उत्तर प्रदेशात ११ जागांवर बोळवण करून आपले काम सुरू केले.

नितीश कुमार हे दोन दशके मुख्यमंत्रीपदाच्या मखरात असले तरी त्यांच्या पक्षाला बिहारमध्ये कधीच स्वबळावर बहुमत मिळाले नाही. तसेच भाजपा, काँग्रेस किंवा राजद यांचीसुद्धा स्वबळावर बहुमत मिळवू, अशी ताकद नाही. नेत्यांच्या भाऊगर्दीत नितीश कुमार हे लवचिक असल्याने सर्वांना युती करण्यासाठी परवडतात. त्याचा मोबदला म्हणून त्यांना मुख्यमंत्रीपद द्यावे लागते.

सन २०२२ मध्ये नितीश कुमार १६ खासदारांसह एनडीएतून बाहेर पडले. पण काँग्रेसने त्याला अपेक्षित महत्त्व दिले नाही. स्वत: नितीश कुमार हे लालू प्रसाद यादव यांना बरोबर घेऊन १० जनपथ, दिल्ली येथे गेले व विरोधी पक्षांच्या आघाडीसाठी पुढाकार घ्यावा, अशी त्यांनी सोनिया गांधी यांना विनंती केली. पण चार महिने झाल्यावरही त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. नितीश कुमार यांनी दिल्लीला जाऊन सर्व विरोधी पक्षांच्या प्रमुखांना निमंत्रण देऊन पाटणा येथे पहिली बैठक घेतली. बंगळूरु, मुंबई बैठकीनंतर इंडिया आघाडीला आकार येऊ लागला होता. जागा वाटपास विलंब का होतो आहे, असे नितीश कुमार यांनी वारंवार विचारूनही काँग्रेसने उत्तर दिले नाही. उलट हरयाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा येथे जागा वाटप होणार नाही अशी भूमिका घेतली. मात्र पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, तामिळनाडू अशा राज्यांत जागा वाटपांसाठी काँग्रेस आग्रही आहे.

भाजपाच्या विरोधात विरोधी पक्षांची आघाडी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतलेल्या नितीश कुमार यांना भाजपाने का जवळ केले? महाआघाडी सरकार पडावे असे नेमके कोणते कारण घडले? आमचे सरकार आले की, मीडियाला लिहिण्या-बोलण्याचे स्वातंत्र्य मिळेल, असे विरोधकांच्या मंचावरून आश्वासन देणाऱ्या नितीश कुमार यांना भाजपाची भूमिका एकदम कशी योग्य वाटू लागली? बिहारच्या विधानसभेत मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी महिलांविषयी आक्षेपार्ह उद्गार काढल्यानंतर भाजपाने मोठा हंगामा तर केलाच, पण स्वत: पंतप्रधानांनीही नितीश कुमार यांची मानसिकता कशी आहे हे जाहीरपणे सांगितले... जे भाजपाला केंद्रातून हटवायला निघाले होते, तेच भाजपाच्या अचानक कवेत जाऊन बसले आहेत... 'आपल्या मूर्खपणामुळे जतीराम मांझी मुख्यमंत्री झाले होते', असे भर विधानसभेत त्यांना उद्देशून नितीश कुमार बोलले होते, तेव्हा मांझी यांचा अवमान झाल्याची चर्चा झाली. भाजपाबरोबर असलेले मांझी व चिराग पासवान आता नितीश कुमार यांचे समर्थक बनले आहेत. जय श्रीराम व जय पलटूराम अशा दोन्ही घोषणा बिहारमध्ये दिल्या जात आहेत.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# महाराष्ट्राला २०२२-२३ मध्ये ३९२५५७ रु.चे गुंतवणूक प्रकल्प प्राप्त

नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) – २०२१-२२ मधील रु. २२८८४९ कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांच्या तुलनेत महाराष्ट्रात २०२२-२३ या कालावधीत रु.३९२५५७ कोटींचे नवीन गुंतवणूक प्रकल्प आकर्षित झाले आहेत, असे एमएसएमई निर्यात प्रोत्साहन परिषदेने कॉन्फेडरेशन ऑफ ऑरगॅनिक फूड प्रोड्युसर्स आणि संयुक्तपणे केलेल्या अभ्यासानुसार विपणन एजन्सी.

अभ्यासाचे प्रकाशन करताना, MSME EPC चे अध्यक्ष, ASSOCHAM चे माजी सरचिटणीस डॉ डी.एस. रावत म्हणाले, CMIE डेटानुसार, '२०२२-२३ मध्ये रु. १७३७६३१ कोटी गुंतवणुकीचे प्रकल्प थकबाकीदार होते आणि रु. १७३७६३१ कोटींच्या अंमलबजावणीत होते. त्यामुळे खर्चात होणारी वाढ टाळण्यासाठी प्रकल्पांच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी सरकारने उच्चाधिकार समिती स्थापन करावी.

२०२२-२३ मध्ये पूर्ण झालेले प्रकल्प R.140058 कोटींचे होते, २०२१-२२ मध्ये रु. ६५०२६ कोटींचे पूर्ण झालेले प्रकल्प आणि रु. ६८६३ कोटींचे पुनरुज्जीवन केलेले प्रकल्प रु.२७१६७ कोटींचे पुनरुज्जीवन झाले, असे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

२०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत, महाराष्ट्राला प्राप्त झालेले एकूण नवीन गुंतवणूक प्रकल्प रु.१११९९७५ कोटी होते आणि रु.३३४०१६२ कोटीचे पूर्ण झाले. खाजगी क्षेत्राने २०२२-२३ मध्ये २८७४३३ कोटी रुपयांचे नवीन गुंतवणूक प्रकल्प जाहीर केले, जे २०२१-२२ मध्ये रु.१७४३८० कोटी होते आणि अनुक्रमे रु.६५४६० कोटी आणि रु.४७८५६ कोटींचे प्रकल्प पूर्ण केले.



देशाच्या सॉफ्टवेअर निर्यातीपैकी २० टक्क्यांहून अधिक वाटा असलेले IT आणि ITeS क्षेत्रातील आघाडीचे राज्य महाराष्ट्र आहे. मुंबई ही भारताची 'आर्थिक राजधानी' आणि 'मनोरंजन राजधानी' असल्याने, कालांतराने 'टेक कॅपिटल' म्हणून उदयास येण्याची शक्यता आहे. उद्योग ४.०, आर्थिक जागतिक क्षमता आणि ॲनिमेशन, गेमिंग आणि कॉमिक्ससह बहुराष्ट्रीय कंपन्या आणि परदेशी गुंतवणूकदारांसाठी स्पर्धात्मक संधी सादर करण्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीला चालना देण्यावर राज्याने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

२०२१-२२ मधील रु. २७१७३९९ कोटींच्या तुलनेत २०२२-२३ मध्ये बँकांकडून एकूण ३३३२७३८ कोटी रुपयांच्या कर्ज वितरणात वाढ झाल्याचे या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. २०२२-२३ मध्ये, कृषी रु. १२१७६५ कोटी, उद्योग रु. ९३८५८८ कोटी, ट्रान्सपोर्ट ऑपरेटर रु. ६८५७८ कोटी, व्यावसायिक आणि इतर सेवा रु. २२२४२८ कोटी, वैयक्तिक कर्ज रु. ७५५८४८ कोटी, व्यापार रु. २७२३१५ कोटी, वितरीत केले गेले. वित्त रु.८०४६३५ कोटी आणि विविध रु.१४८५७९ कोटी.

राज्यात २०.४३ लाख एमएसएमई उद्योग नोंदणी पोर्टल अंतर्गत नोंदणीकृत आहेत जे १०८.६७ लाख लोकांना रोजगार देतात, विशेष निर्यात प्रोत्साहन क्षेत्रांची लक्षणीय संख्या. याव्यतिरिक्त, महाराष्ट्रात कुशल आणि औद्योगिक कामगारांचा मोठा आधार आहे, ज्यामुळे ते ज्ञानावर आधारित आणि उत्पादन क्षेत्रासाठी आदर्श गंतव्यस्थान बनले आहे.

राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात २० टक्के योगदान देणारे राज्य हे दुसरे सर्वात औद्योगिक राज्य आहे; जीएसडीपीच्या जवळपास ४६ टक्के उद्योगांचे योगदान आहे. रु.३५.२७ ट्रिलियन (US$440 अब्ज) चे सकल राज्य देशांतर्गत उत्पादन आणि रु. २४२२४७ (US$३०००) दरडोई उएअ्ञ असलेली राज्याची अर्थव्यवस्था ही भारताच्या अर्थव्यवस्थेत एकूण १४ टक्के वाटा असलेला एकमेव सर्वात मोठा योगदानकर्ता आहे. – भारत नाममात्र GDP. रावत म्हणाले की, थकबाकीदार प्रकल्प वेळेत सुलभ झाल्यास राज्याच्या अर्थव्यवस्थेला रोजगाराच्या संधी निर्माण करतील.

# कुष्ठरोग बाबत जनजागृती आवश्यक

**भारत** देशात विविध प्रकारचे आजार घर करून आज ही ठाण मांडून बसलेले आहेत,या आजारांमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहे, यामुळे देशाचे मनुष्यबळ झपाट्याने कमी,कमी होत आहेत, याचा परिणाम देशाच्या विविध उद्योगावर तसेच देशाच्या विकास प्रणालीवर होत आहे, अनेक आजारापैकी कुष्ठरोग हा रोग आजही देशात घर करून आहे, ७६-७७वर्षापूर्वीपासून कुष्ठरोग देशातून समूळ उच्चाटन साठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत मात्र अद्यापही कुष्ठरोग देशांत आहे. दरवर्षी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी पासून म्हणजे ३०जानेवारी पासून १३ फेब्रुवारीपर्यंत कुष्ठरोग पंधरवडा साजरा केल्या जातो. मात्र पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही, शासनाने आयोजित कुष्ठरोग उपक्रमानाही नागरिक उपस्थित राहत नाही आणि त्यामुळे या रोगाची माहिती तळा-गळातील नागरिकांमध्ये पोहचत नाही व त्यामुळे ह्या आजाराचे प्रमाण दिवसे न दिवस वाढत आहे, या बाबत देशातील व्यक्तीचे मेळावे घेऊन, गटा, गटा माहिती द्यावी, खेड्यातील, वाड्या, वस्त्यावर सुध्दा या आजाराची माहिती द्यावी, लक्षणे सांगावीत व भित्ती पत्रके गावो गावी लावावीत,चित्रफीत ही दाखववी, रुग्ण शोध मोहीम आखावी व रुग्ण ही शोधावे, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त या वर्षीही म्हणजे, ३०जानेवारी २०२४पासून ते १३फेब्रुवारी पर्यंत कुष्ठरोग पधरवडा साजरा होत आहे,त्या निमित्ताने देशभर व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी असे वाटते.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# अरिहंत गृप ने भक्ती संध्या कार्यक्रमाचा रचला इतिहास



छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - अरिहंत गृप व कमेटी मेंबर च्या वतीने सकल जैन समाज संभाजीनगर च्या महावीर जैन गौशाला चिकलठाणा येथे आयोजित विराट भक्ती चा कार्यक्रम हजारो बंधु भगिनीच्या प्रचंड उत्सावात संपन्न झाला या विराट भक्ती संध्या कार्यक्रमाने एक इतिहास सकल जैन समाजाच्या आध्यात्मिक कार्याच्या उमटला.

अरिहंत गृप ने आचार्य विजय शांती सुरिश्वरजी महाराज यांची गुरुभक्ती, देशभक्ती व गोसेवेसाठी प्रोत्साहन करण्यासाठी सदर भजन संध्ये चे आयोजन केले आणी ते आयोजन फलिश्रित पण झाले शेकडो नागरिकानी गोसेवेसाठी आपली मदत जाहिर केली. बिकानेर येथील आंतरराष्ट्रीय जैन संगितकार गुरुभक्त पिंटु स्वामी यांच्या सुमधुर कंठातुन अनेको भक्तीगीते गायिली या भजनात सेकडो तरुण तरुणी भक्तीत बेधुंद होऊन आनंद घेतला.

कार्यक्रमास सकल जैन समाज च्या विविध संघ समाजांचे अध्यक्ष व पदाधिकारी प्रमूख अतिथी म्हणून उपस्थित होते अरिहंत गृप द्वारा त्यांचा सत्कार करण्यात आला. पिंटु स्वामी यांनी सांगितले मी आज पर्यंत सेकडो कार्यक्रम बघीतले पण महिलाची हजारोची उपस्थित मी आज प्रथमच बघीतल्याची सांगताच टाळ्याचा कडकडाट झाला देशभक्ती व गोसेची भजने गाऊन पिंटु स्वामी यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. या आयोजनासाठी सुपडुलाल नहाटा, निर्मलकुमार कोठारी व मनोजजी बोरा नम्रता गृप मुगदीया परिवार, यांचे विषेश व अनेक परिवाराचनी सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरिहंत गृप व कमेटी मेंबर्स यांनी कठोर परिश्रम घेतलेल्याची माहीती अरिहंत गृप च्या वतीने देण्यात आली.

### मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाच्या सर्वेक्षणास दि.२ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील मराठा व समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाचे सर्वेक्षण दि.३१ जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण करण्याबाबत यापूर्वी कळविण्यात आले होते. काही ठिकाणी सर्वेक्षण दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण होऊ शकत नसल्याने सर्वेक्षणास मुदतवाढ देण्याची आवश्यकता असल्याचे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे निर्दर्शनास आले आहे. यामुळे सर्वेक्षणास दि.२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा, महानगरपालिका क्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम दि.२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्वेक्षणाचे काम प्रगणकांनी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत.

# अनधिकृत कर्जमाफी मोहिमांबाबत सावधानता बाळगण्याचे आरबीआयमार्फत आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला (RBI) कर्जमाफीची ऑफर देऊन कर्जदारांना भुरळ घालणाऱ्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती निदर्शनास आल्या आहेत.

या संस्था समाजमाध्यमाच्या प्लॅटफॉर्मवर (फेसबुक, इन्सटाग्राम, यु-टयुब चॅनल आणि बनावट वेबसाईट) यावर अनेक मोहिमांचा सक्रियपणे प्रचार करीत असल्याचे दिसुन आले आहे. अशा संस्थाना कोणत्याही अधिकाराशिवाय कर्जमाफी प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी सेवा शुल्क आकारत असल्याच्या बातम्या आहेत. ज्यामुळे बँकांना आकारल्या जाणाऱ्या मालमत्ता तारणावर त्यांचे अधिकार लागू करण्यासाठी बँकांच्या कामकाजात अडथळा येतो. बँकांसह इतर वित्तीय संस्थांची थकबाकी भरण्याची गरज नाही. असा चुकीचा अर्थ अशा संस्था देत आहेत. अशा कृतीमुळे वित्तीय संस्थांची स्थिरता आणि सर्वात महत्त्वाचे ठेवीदारांच्या हितास बाधा येत आहे. यामुळे हे देखील लक्षात घेतले जाऊ शकते अशा संस्थांशी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी संबंध ठेवल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

अशा खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या समाजमाध्यमातील बँकाविषयाची खोट्या प्रचार मोहिमांना बळी पडू नये.खोट्या घटना आढळल्यास आपल्या जवळच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी किंवा तक्रार नोंदवावी. असे परिपत्रक RBI मार्फत जारी करण्यात आले आहेत. समाज माध्यमावरील खोटया प्रचार मोहिमा करणाऱ्या संस्थेच्या आवाहनाला जिल्ह्यातील नागरिकांनी बळी पडू नये. असे आवाहन जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार यांनी केले आहे.

# राष्ट्रीय मतदार दिनी वैजापूर शहरात मतदार जागृती प्रतिज्ञा



वैजापूर, दि. ३१ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय मतदार दिनी भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी शहरातील तरुण मतदार व इतर ही मतदारांना लोकशाही शासन प्रणालीवर निष्ठा ठेऊन व कोणत्याही निवडणुकांचे पावित्र्य राखून प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश,जात,समाज, भाषा यांच्या विचाराच्या प्रभावाखाली न येता,किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी शपथ दिली,या प्रसंगी बाळासाहेब त्रिभुवन,पत्रकार सुनील त्रिभुवन,राहुल त्रिभुवन, आकाश भाटे,सुनील पवार,किरण कोळसे व युवा मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# ‘लोकशाही’ चित्रपटाचा शानदार ट्रेलर आणि म्युझिक लॉंच सोहळा दणक्यात पार पडला!



छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) -लोकशाही चित्रपटाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. हीच उत्सुकता पुढे ताणत ३० जानेवारी २०२४ रोजी चित्रपटाचा ट्रेलर आणि म्युझिक लॉच सोहळा दणक्यात पार पडला आहे. प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या जबरदस्त ट्रेलर आणि चित्रपटातील गाण्यांने रसिकांचं मन जिंकून घेतलं असून सोशल मीडियावर प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे.

घराणेशाहीत जगणाऱ्या प्रस्थापितांचा कोणत्याही थराला जाऊन सत्ता मिळवण्याचा हव्यास ट्रेलरमधून दिसत आहे. या सत्तासंघर्षात कोणाचातरी जीव जाणार आहे, पण कोणाचा जीव कोण घेणार या रहस्याचं कोडं चित्रपटात उलगडणार आहे. मनाला प्रश्नांच्या घेऱ्यात अडकवणारं कथानक, गंभीर आणि खोल संवाद, दर्जेदार कलाकारांची जुगलबंदी, मंत्रमुग्ध करणारी गाणी आणि अंगावर शहरे आणणारं पार्श्वसंगीत या समीकरणामुळे लोकशाही चित्रपटाची चर्चा महाराष्ट्रात सर्वत्र होताना दिसत आहे.

चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा चित्रपटाचे निर्माते सुशीलकुमार अग्रवाल, ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे, तेजश्री प्रधान, अमितरियान आणि सर्व कलाकार व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दणक्यात पार पडला. मोहन आगाशे यांनी ‘चित्रपट निर्मितीची प्रक्रिया धमाल मजेदार होती’ असं सांगितलं असून चित्रपटाच्या प्रदर्शनाची त्यांना प्रचंड उत्सुकता आहे. संगीत दिग्दर्शक संजय राजी या जोडीमधील राजी यांनी ‘सख्या रे’ हे सुमधुर आणि जयदीप बागवडकर यांनी ‘ओ भाऊ’ हे उत्साही गाणं गाऊन सोहळ्यातील उपस्थितांची मने जिंकली.

‘गेली चाळीस वर्ष अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड, भारतीय सिनेसृष्टीत सिडी डिविडीपासून ओटीटीपर्यंत बदलत्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेत दिमाखात आपलं अस्तित्व टिकवून आहे. लोकशाही हा राजकारणातील अराजकता टिपणारा आणि घराणेशाही व्यवस्थेवर बोट ठेवणारा प्रभावी चित्रपट आहे.’ असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीकुमार अग्रवाल म्हणाले.

### डॉ.प्रवीण वक्ते यांना पितृशोक

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) -



येथील श्री गजानन महाराज देवस्थानचे (गारखेडा) संस्थापक अध्यक्ष प्रा.श्रीधर पंढरीनाथ वक्ते (स्वामी दिव्यानंद सरस्वती) यांचे आज पहाटे निधन झाले. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी डॉ. प्रविण वक्ते यांच्या सिडको एन-५ प्रियदर्शिनी कॉलनी येथील निवासस्थानी दुपारी १२ वा.पर्यंत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. तत्पश्चात त्यांच्या समाधीयोग कार्यक्रमासाठी दुपारी १२ नंतर त्यांचे पार्थिव पैठणकडे मार्गस्थ करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी पावन गणपती मंदिराजवळील शेतात अंत्यविधी करण्यात येणार आहेत.

प्रा. श्रीधर वक्ते यांच्या पश्चात डॉ. प्रवीण वक्ते (माजी प्रकुलगुरु), डॉ. शिवाजी वक्ते (परभणी ) ही दोन मुले, कन्या ॲड. शुभांगी वक्ते (हायकोर्ट), नातवंडे व मोठा शिष्य परिवार आहे. वसंतराव नाईक महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून ते कार्यरत होते. काही वर्षांपूर्वी त्यांनी संन्यास घेतला होता.

# अलंकार सोसायटी येथील मुख्य व अंतर्गत जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - अलंकार सोसायटी येथील मुख्य व अंतर्गत जलवाहिनी टाकण्याचा कामाचा शुभारंभ शिवसेना पूर्व विधानसभा संघटक राजुभाऊ वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आला एस आर पेट्रोल पंप ते नागे सर ते भगवानराव पवार, श्रीरंग आर्केट ते पवार यांच्या घरापर्यंत व श्रीनिवास आपारमेंट ते डॉ बक्षी यांच्या घरापर्यंत, खटोड काकू यांच्या घरापासून ते श्री धोका यांच्या घरापर्यंत या भागात जुन्या जलवाहिनी असल्यामुळे नागरिकांना योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होत नव्हता त्यामुळे नागरिकांनी नगरसेवक राजुभाऊ वैद्य यांना या जलवाहिन्या बदलण्यासंदर्भात विनंती केली होती याची दखल घेऊन तातडीने एमजेपी व जे बी पी आर या दोन्ही संस्थांची संबंध साधून त्वरित या जलवाहिनीच्या कामाचे अंदाजपत्रक व मंजुरी घेण्यात आली यावेळी नागरिकांनी आनंद व्यक्त केला व राजुभाऊ वैद्य यांचा सत्कार केला

यावेळी शिवाजीराव पाटील, किसनराव गवळी, आप्पासाहेब नागे, भगवानराव पवार अरुण चव्हाण, विश्वनाथ पवार, सुधाकर चव्हाण, इंजिनीयर अंकुश वाघ ,कंत्राटदार विजय ढोके, सचिन गोळेकर, आबा शेळके, संतोष बोर्डे भाऊसाहेब राते, बाबू सिंग हजारी, बाळासाहेब वाळुंज, हरिभाऊ काळे, गजानन गायकवाड, सौ विजया बैरागी,सौ भावना पवार, सौ उमा चव्हाण,अलका पवार, सुनंदा डाफणे, अखिल शेख, राजु चव्हाण,राम केकान, संदीप अहिरे, माधव मोरे, समीर शेख, रमेश काथार, आदी उपस्थित होते.

# तिढा सुटला ! पाणी योजनेसाठी शासनाकडून अतिरिक्त २०० कोटींचा निधी वितरीत

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - शहराच्या २,७४० कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाने महापालिकेला एक हजार ६८ कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. विशेष म्हणजे, महापालिकेने ८११ कोटी रुपयांची मागणी केली असताना शासनाने २०० कोटींपेक्षा जास्तीची रक्कम दिली आहे. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत पाणी योजनेच्या कामासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असे सूत्रांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेतून शहरासाठी २,७४० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत केंद्र शासनाचा ३०, राज्याचा ४५ तर महापालिकेचा ३० टक्के वाटा आहे. त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने योजनेसाठी आत्तापर्यंत ७३९.५५ कोटी रुपयांचा निधी महापालिकेला दिला आहे.

तसेच महापालिकेने समांतर पाणी पुरवठा योजनेअंतर्गचा निधी या योजनेसाठी वापरला आहे. त्यानुसार योजनेचे काम करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला महापालिकेने आत्तापर्यंत ९८१ कोटी ६५ लाख रुपये दिले आहेत. दरम्यान आजपर्यंत झालेल्या कामाचे कंत्राटदाराला बिल देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महापालिकेकडे ८११ कोटी निधीची मागणी केली होती. मात्र, महापालिकेकडे निधी उपलब्ध नसल्याने प्रशासक जी. श्रीकांत यांनी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र देऊन ८११ कोटींच्या निधीची मागणी केली होती.

त्यानुसार शासनाने सोमवारी (ता. २९) महापालिकेला एक हजार ६८ कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. महापालिकेने मागणी केल्यापेक्षा सुमारे २०० कोटी रुपये जास्तीचा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे मार्च-एप्रिल महिन्यापर्यंत योजनेच्या कामासाठी निधी कमी पडणार नाही, असे सूत्रांनी सांगितले.

या योजनेत महापालिकेला ८२२ कोटी रुपयांचा स्वहिस्सा द्यावा लागणार आहे. मात्र, महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने हा वाटादेखील राज्य शासनाने उचलावा, अशी विनंती वारंवार केली जात आहे. न्यायालयाने देखील यासंदर्भात शासनाला निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली आहे, पण निधी मंजुरीच्या पत्रात यासंदर्भात कुठलाही उल्लेख करण्यात आलेली नाही. त्यामुळे ८२२ कोटींच्या निधीचा प्रश?न अद्याप कायम आहे. असे असले तरी तब्बल २०० कोटी रुपये जास्तीचे देण्यात आल्यामुळे शासनाकडून महापालिकेच्या वाट्याचा निधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# प्रत्येक मुलां-मुलींचा जन्मदाता ‘बाप’ हा त्यांच्या उज्वल भविष्याचा पाया असतो

**या** जगतातील प्रत्येक बापाची भूमिका आपल्या मुलां-मुलींच्या उज्वल भवितव्याचीच असते, मात्र आज या उज्वल भवितव्य घडविणाऱ्या बापाला व आईला वृद्धाश्रम मध्ये पाठविणारे हजारोच्या संख्येने आहेत, ज्या बापाने सदैव आपल्या मुलामुलींच्या उज्वल भवितव्यासाठीच हाडाची खडी व रक्ताचे डांबर केले. त्या जन्मदात्या बापाला शेवटच्या क्षणी पोराने पाणी पाजू नये, तिरडीला खांदा देऊ नये, विदेशात असेल तर अंतिम संस्काराला येऊ नये हे आमच्या संस्कृतीचे, संस्काराचे दुर्दैव आहे, केवळ आणि केवळ पैसा हे सर्वस्व नाही,आपले जन्मदाते प्रथम आणि बाकीच्या बाबी नंतर हे आम्हाला कळू नये, आमचे व आमच्या संस्कृती चे दुर्दैव !आम्ही मुलामुलींना घडवण्यात कुठे कमी पडलो याचा आज प्रत्येक बाप विचार करत आहे,ज्या बापानं मुलांचे भविष्य घडविताना कधीच स्वतः चा विचार केला नाही, आपले आजारपण लपवले,आपल्या व्यथा लपविल्या,स्वतः फाटके-तुटके कपडे वापरले,मात्र मुलींना भारीतले भारी कपडे घेऊन दिले, भारी मोबाईल घेऊन दिले. कित्येकदा बाप उपाशी झोपतो, सर्व सामान्य बापाजवळ मुलांना शिकबिण्याची ऐपत नसते, बिचारा कर्ज काढतो, मात्र मुलामुलींची सर्व प्रकारची हौस,मौज पूर्ण करतो, शहरात शिकणाऱ्या मुलां-मुलींना ओढाताण असतांना पैसे पाठवितो,पण त्याच्या ईच्छा -आकांक्षावर पोर पाणी फेरतात तरी बाप दुःख गिळून शांत राहतो, मात्र बापाच्या हाल अपेष्टा ची जाणीव आजची मुलं ठेवत नाही याचं दुःख होत, आजच्या मुलामुलींनो आई बाप च तुमचे ‘विठ्ठल-रुख्मिनी’आहेत हे विसरू नका, टाटा -बिर्ला, किंवा राष्ट्रपती यांच्या पाठीवरील थापी पेक्षा आई-वडिलांची पाठीवरील शाबासकीची थाप ही जगात सर्वश्रेष्ठ आहे हे विसरू नका आई बापाची वृद्धापकाळी सेवा ही जगातील सर्वश्रेष्ठ सेवा आहे, त्यांचा आधार बना, वृद्धाश्रमात नव्हे तर गृहस्थाश्रमात ठेवा ,तुमच्या मुलांना आज नैतिकतेच्या, सुससंस्कारच्या गोष्टी सांगण्यासाठी आजी-आजोबांची चीच गरज आहे, आज जो आपल्या आईबापाचे हाल करील उद्या त्याची मुलही त्यांचे हाल करतील हे विसरू नका,मुलांनो या जगतात तूमचं हित चिंतणारा एकमेव हितचिंतक म्हणजे ‘बाप’आहे हे विसरू नका.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू होता गोरखधंदा; १३ तरुणींची सुटका

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) - शहरातील एन-३ परिसरात असलेल्या दोन स्पा सेंटरवर अचानक पोलिसांनी धाड टाकली. यावेळी स्थानिक तरुणांसह काही तरुणी नको त्या अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी तातडीने तरुणांसह १३ तरुणींना ताब्यात घेतलं. तसेच रोकड, देहविक्रीसाठी लागणारे साहित्य जप्त केले.

रविवारी (३० जानेवारी) रात्री ७ वाजता आकाशवाणी परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पुंडलिकनगर आणि जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

स्पा सेंटरच्या नावाखाली हायप्रोफाइल वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती स्थानिक पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, गोपनीय माहितीच्या आधारे सापळा लावण्यात आला. पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकाराची खात्री करून घेतली. त्यानंतर छापेमारी करत १३ तरुणींची सुटका केली. या तरुणी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि म्यानमारच्या असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी महिला मॅनेजरसह अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. मागील काही दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर शहरात वेश्या व्यवसायाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी सिडको ठाण्याच्या निरीक्षक गीता बागवडे यांच्या पथकाने एन-७ भागातील तांबट एज्युकेशनच्या बिल्डींगमध्ये छापा मारून कुंटणखान्याचा पर्दाफाश केला होता.

त्यानंतर काँवत यांच्या पथकाने बीड बायपासवरील सेनानगरात छापा मारून कुख्यात तुषार राजपूतचा हायप्रोफाइल वेश्या व्यवसाय अड्डा उद्ध्वस्त केला होता. दरम्यान, शहरात ५० एजंट कार्यरत असल्याची माहिती तपासातून समोर आली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शासकीय कर्करोग रूग्णालयात पेट स्कॅन सुविधा उपलब्ध करून द्या

## आमदार सतीश चव्हाण यांची वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय कर्करोग रूग्णालयात पॅट स्कॅन सुविधा उपलब्ध नसल्याने रूग्णांना बाहेरच्या ठिकाणी तपासणी करावी लागते. त्यामुळे शासकीय कर्करोग रूग्णालयात अद्यावत असे पॅट स्कॅनची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि.३१) मंत्रालयात हसन मुश्रीफ यांची सदिच्छा भेट घेऊन निवेदन दिले. आमदार सतीश चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय कर्करोग रूग्णालयात उपचारासाठी मराठवाड्यासह खानदेश, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील रूग्ण उपचारासाठी येतात. याठिकाणी दररोज २५० ते ३०० बाह्यरूग्ण तपासणी होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्यानुसार कर्करोग असलेल्या रूग्णापैकी ९० टक्के रूग्णांचे पेट स्कॅन करणे आवश्यक असते. मात्र शासकीय कर्करोग रूग्णालयात पेट स्कॅनची सुविधा उपलब्ध नसल्याने रूग्णांना बाहेर खाजगी ठिकाणी ही तपासणी करावी लागते. मात्र यासाठी रूग्णांना १५ ते २० हजार रूपये खर्च येतो. गोरगरीब रूग्णांना आर्थिकदृष्ट्या हा खर्च परवडत नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

पेट स्कॅन मशिनसाठी अंदाजे ३० कोटी रूपय इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरील सुविधा कर्करोग रूग्णालयात उपलब्ध झाल्यास नाममात्र खर्चात रूग्णांना पेट स्कॅन करता येईल. त्यामुळे पुण्यातील ससून रूग्णालयाच्या धर्तीवर छत्रपती संभाजीनगर शहरातील शासकीय कर्करोग रूग्णालयात पेट स्कॅनची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी मंत्री महोदयांकडे केली. ना.हसन मुश्रीफ यांनी देखील आमदार सतीश चव्हाण यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यासंदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी सांगितले.



# कॅमेरा सहायक कैलास म्हस्के यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप



छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक माहिती कार्यालयातील कॅमेरा सहायक श्री. कैलास म्हस्के यांना सेवानिवृत्तीनिमित्त संचालक कार्यालयात विशेष समारंभातून निरोप देण्यात आला. संचालक श्री. किशोर गांगुर्डे यांनी श्री. म्हस्के यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संचालक माहिती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात सहायक संचालक गणेश फुंदे, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास यांच्या हस्ते श्री. म्हस्के यांचा कुटुंबियांसह सत्कार करण्यात आला. श्री. म्हस्के यांच्या सेवाकाळातील कार्याचा यावेळी गौरव केला व त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित संचालक माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय तसेच माहिती केंद्रातील अधिकारी व सहकाऱ्यांनी आपल्या भाषणांमधून श्री. म्हस्के यांच्या कार्याबाबत आपले विचार व्यक्त केले. प्रभारी माहिती सहायक प्रविण भानेगावकर, टी. व्हि. कॅमेरामन संजय परदेशी, वरिष्ठ लिपिक यशोदा ताठे, लिपिक सतिष वाबळे, श्री. अशोक सुरडकर, श्री.चंद्रकांत लोखंडें तसेच सेवानिवृत्त कर्मचारी श्री. जॉन चार्ल्स, श्री. एल. डी. पाटील, श्री. अशोक खरात यांनीही मनोगत व्यक्त केले.

मूळचे छत्रपती संभाजीनगर येथील असलेले श्री. म्हस्के २८ वर्षांच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनातील शासकीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. श्री. म्हस्के १९९५ मध्ये शासकीय सेवेत रुजू झाले, त्यानंतर त्यांनी कॅमेरा सहायक म्हणून सेवा केली आहे.

# एसईए सोसायटीच्या अध्यक्षपदी दीपक माने, सचिवपदी गणेश सोनवणे

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांच्या सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षपदी छत्रपती संभाजीनगर येथील महावितरणचे अभियंता दीपक माने व सचिवपदी महापारेषणचे अभियंता गणेश सोनवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी लातूर येथील अभियंता राजीव भुजबळे आणि कोषाध्यक्षपदी अभियंता विठ्ठल सपकाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीने नुकताच पदभार स्वीकारला. यावेळी मराठवाड्यातील सर्व नवनिर्वाचित संचालक अभियंते उपस्थित होते. त्यात प्रामुख्याने राजेश आंबेकर, प्रकाश वाहुळे, संतोष वाळके, रघुनंदन कुलकर्णी, महेश घावट, ईश्वर तावरे, जे. जे. चौधरी, रमेश तालोद, नीलेश सोनवणे, प्रदीप मिसाळ, श्रीदेवी सौदागर, सीमा गाडेकर, सुधीर ओहाळकर, विवेक स्वामी, जयंत जाधव, राहुल गाडे आणी राजाभाऊ नागरे यांचा समावेश आहे.

पदाधिकारी निवड प्रक्रियेत अभियंता अविनाश चव्हाण, प्रजीत नाईकवाडे, राजेंद्र राठोड, अविनाश जोशी, प्रशांत येणगे आदींनी परिश्रम घेतले. प्रशांत बनसोडे यांनी आभार मानले. महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी नवनिर्वाचित संचालक मंडळ तथा कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

# 'मूकनायक'च्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी वंचित समाजाला आवाज दिला

## डॉ.यशवंत भंडारे यांचे प्रतिपादन, मूकनायक दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक आणि इतर वृत्तपत्रांच्या माध्यमातून वंचित समाजाला बोलके केले. यांचे प्रश्न जगासमोर प्रभावीपणे मांडून व्यवस्थेला हादरे दिले. स्वातंत्र, समता, बंधुता या मानवी मूल्यांवर आधारीत पत्रकारितेचे मानदंड घालून दिले. परंतु सध्याच्या माध्यमांनी आपली भूमिका बदलल्याने समाजामध्ये अस्वस्थता वाढली आहे. या स्थितीतही पत्रकारांनी बाबासाहेबांना आपेक्षित असलेली समाजहिताची पत्रकारिता करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे माजी विभागीय संचालक डॉ. यशवंत भंडारे यांनी केले.

मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲंड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि विक्रमशिला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मूकनायक दिना' निमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार तथा न्यूज टाऊनचे संपादक सुरेश पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय पाईकराव, डॉ. सुरेश मांदळे, डॉ. पटेकर, पत्रकार अंकूश थोरात, शेख अन्वर, विजय बहादुरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. भंडारे यांनी भारतातील पत्रकारितेच्या इतिहासावर प्रकाश टाकत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचे वेगळेपण आधोरेखीत केले. तत्कालीन कालखंडामध्ये अनेक वृत्तपत्र होती. परंतु त्यातून अस्पृश्य समाजाचे, वंचित घटकांचे प्रश्न मांडलेच जात नव्हते. हे ओळखूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चळवळीला पाठबळ देण्यासाठी ३१ जानेवारी १९२० मध्ये मूकनायक वृत्तपत्र काढले. मूकनायकासह इतर वेगवेगळ्या पाच वृत्तपत्रातून वंचित घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात जगजागृती करत संघर्ष करण्यासाठी, हक्कांसाठी लढण्यासाठी तयार केले. बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुध्द भारत अशी वैशिष्टपूर्ण नावे वृत्तपत्रांना दिली. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय स्पष्ट होते. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून एकीकडे वंचित घटकांमध्ये जनजागृती करीत असताना दुसऱ्या बाजुला व्यवस्थेलाही अनेक प्रश्न विचारले. प्रतिकूल परिस्थितीतही बाबासाहेबांनी पाच वृत्तपत्र चालवूनही त्यांना पत्रकार म्हणून पाहिले जात नसल्याबद्दल डॉ. भंडारे यांनी खंत व्यक्त केली. माध्यमे लोकमत घडविण्याचे काम करतात. मात्र, आताच्या माध्यमांनी समाजाला जागृत करण्याची भूमिका सोडून दिल्याने समाजामध्ये अस्वस्थता पसरली आहे. त्यामुळेच जबाबदार पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपेक्षित असलेली समाजहिताची पत्रकारिता करावी, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात सुरेश पाटील यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेवर प्रकाश टाकताना सांगितले की, बाबासाहेबांचा मूकनायक हा व्यवस्थेला प्रश्न विचारणा होता. स्वराज्य हा जसा इतरांचा अधिकार आहे. त्या स्वराज्यामध्ये अस्पृश्य समाजाचे स्थान काय, असा प्रश्न बाबासाहेबांनी अग्रलेखातून उपस्थित केला होता. कोणाचाही भीडभाड न ठेवता बाबासाहेबांनी पत्रकारिता केली. त्यामुळे मूकनायक हे अस्पश्यांचे वृत्तपत्रच नव्हते तर ते अस्तित्वपत्रच असेही पाटील म्हणाले. पाटील यांनी सध्याच्या माध्यमांच्या भूमिकांवर सडकून टिका केली. विविध उदाहरणे देऊन माध्यमे कशी भरकटली असून ते नागरिकांना माहिती देण्याऐवजी त्यांची दिशाभूल करण्यात मशगूल असल्याचे सांगितले. पत्रकारिता आणि प्रपोगंडा यामधील फरक मिटलेला असून दिवसेंदिवस पत्रकारितेची अवणती होत आहे. पत्रकारांकडूनच लोकशाहीचा घात केला जात असून लोकशाही अंताकडे वाटचाल सुरू असल्याची टिका त्यांनी केली. लोकशाही वाचवायची असेल तर बाबासाहेबांच्या मानदंडावर आधारित पत्रकारिता केली पाहिजे, असे प्रतिपादनही सुरेश पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. सचिन बनसोडे यांनी मूकनायक दिनाचे महत्व, मूकनायक दिन साजरा करण्यामागची भूमिका सांगितली. सूत्रसंचालन मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. अस्मिता साळवे यांनी केले तर आभार योगिराज वाघमारे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय अंकूश खेत्रे, चेतन सोनकांबळे यांनी करवून दिला. कार्यक्रमाच्या यश्वस्वीतेसाठी मॉर्डन कॉलेज आणि विक्रमशिला कॉलेजचे संतोष प्रधान, ज्योती मोरे, प्रज्ञा सोनवणे यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# मविआच्या ४० लोकसभा मतदारसंघातील जागावाटप फायनल, मात्र ८ जागांवर तिढा कायम

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या ४० जागांवर अंतिम निर्णय झाल्याचं सांगण्यात येत आहे. या ४० जागांमध्ये कोणाला कोणता मतदारसंघ हे जवळपास निश्चित झालं आहे. मात्र अजूनही ८ जागांवरून तिढा कायम आहे. या ८ जागांवर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेसमध्ये वाटाघाटी सुरु आहेत. त्यातच प्रकाश आंबडेकर यांची वंचित बहुजन आघाडी आणि राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना यांचाही महाविकास आघाडीत समावेश असल्याने, त्यांच्या पक्षांनाही एक एक जागा देण्यात येणार आहे. या दोन्ही जागा सध्या तरी ठाकरेंच्या वाट्यातून देण्यात येणार असल्याचं सांगण्यात येत आहे.

महाविकास आघाडीच्या बैठकीत राज्यातील लोकसभेच्या ४८ पैकी ४० जागांवर कोणता पक्ष निवडणूक लढवणार हे जवळपास फायनल झाल्याचं सांगण्यात आलं. तर उर्वरित ८ जागांचा तिढा अद्याप कायम आहे. या जागांमध्ये रामटेक, हिंगोली, वर्धा, भिवंडी, जालना आणि शिर्डी यांचा समावेश आहे जिथे शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस दावा करत आहेत. याशिवाय काँग्रेस पक्ष मुंबई दक्षिण मध्य मतदारसंघ आणि मुंबई उत्तर पश्चिमच्या जागा मागत आहे. मात्र २०१९ मध्ये दोन्ही जागांवर शिवसेना विजयी झाली होती. उद्धव ठाकरे गट दोन्ही जागा सोडण्यास तयार नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २ फेब्रुवारीला होणाऱ्या पुढील बैठकीत हा तिढा सुटला नाही, तर हा मुद्दा तिन्ही पक्षाच्या नेतृत्वासमोर मांडला जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

यासोबतच वंचित बहुजन आघाडीच्या मविआ मधील समावेशनंतर वंचित बहुजन आघाडी सुद्धा जागा वाटपासंदर्भात आपली भूमिका २ फेब्रुवारीला होणाऱ्या बैठकीत ठेवणार आहे.

# शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश मारणेला अटक

पुणे दि.३१ (प्रतिनिधी)- गँगस्टर शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश मारणे याच्यासह तिघांना पुणे पोलिसांनी थरारक पाठलाग करून पकडले. गणेश मारणे हा शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असून तो गेल्या अनेक दिवसांपासून फरार होता. पुणे पोलीस गुन्हे शाखेने नाशिक रोड येथून अटक केली. शरद मोहेळ हत्याप्रकरणातील मुख्य सुत्रधार गणेश मारणे, विठ्ठल शेलार यांच्यासह १६ जणांवर मोक्का लावण्यात आला.

पुण्यातील कुख्यात गुंड शरद मोहोळची ५ जानेवारी रोजी दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेने पुण्यासह राज्यात एकच खळबळ उडाली होती.

शरद मोहोळ हत्या प्रकरणात २० हून अधिकजणांना अटक करण्यात आली आहे. शरद मोहोळची हत्या झाल्यानंतर काही तासांमध्ये सात जणांना अटक करण्यात आली. त्यानंतर १५ जानेवारी रोजी पुणे पोलीसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्या प्रकरणात दहा जणांना पनवेल आणि वाशीमधून अटक केली. विठ्ठल शेलार, रामदास उर्फ वाघ्या मारणे यासह दहा जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अटक केली होती.

आतापर्यंत मुन्ना पोळेकर हा मुख्य आरोपी असल्याचे मानले जात होते. पोळेकरने इतर साथीदारांसोबत या हत्तेचा कट रचल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले होते. मात्र, पोलीस तपासात अनेक गोष्टी समोर आल्यानंतर अनेकजण पोलिसांच्या रडारवर आले आहेत. पुणे पोलिसांनी आज नाशिकमधून या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला गणेश मारणे याला अटक केली आहे.

(पान १ वरुन)

## हिंमत असेल तर मंडल आयोगाला आव्हान...

जिथे ओबीसी घरे आहेत तिथे त्यांना त्रास दिला जात आहे. जिथे दोन-चार घरे आहेत, एखादे घर आहे ते गावे सोडत आहेत. उत्सव साजरा करा पण ओबीसींविरोधात उन्मादी उत्सव करणे चुकीचे आहे. मला वाटत आहे परिस्थिती चिघळत चालली आहे, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचं म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मैदानात उतरण्याची तयारी दर्शवली आहे. कारण, त्यांच्याकडून २० फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगरमध्ये भव्य सभेचं आयोजन करण्यात आले आहे. या सभेत नवीन अध्यादेशाला विरोध केला जाणार आहे. त्यामुळे आता या सभेत कोणते-कोणते ओबीसी नेते उपस्थित राहणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे.

## मराठा-ओबीसी आरक्षणावर प्रतिक्रिया देऊ नका;...

न देण्याची सूचना दिली असल्याची माहिती मिळत आहे. ओबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने राज्यातील वातावरण तापत असताना, ओबीसी आमदारांनी आपआपल्या तालुका पातळीवर त्यांना जो योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा अशी सूचना देखील दिली गेली आहे. आगामी काळात ओबीसी मराठा संघर्ष आणखी वाढणार असल्याने अजित पवारांकडून खबरदारीचा उपाय म्हणून या सूचना देण्यात आल्याचे बोलले जात आहे. तसेच, मराठा आरक्षणाचा विषय कोर्टात जाण्याची अजित पवार यांनी शक्यता वर्तवली आहे.

मागील काही दिवसांपासून मराठा विरुद्ध ओबीसी असे वातावरण पाहायला मिळत आहे. अशात मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांना अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ उघडपणे विरोध केला आहे. विशेष म्हणजे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊ नयेत यासाठी भुजबळ यांच्याकडून राज्यभरात सभा देखील घेण्यात येत आहे. त्यामुळे मराठा समाजाचा भुजबळ यांना प्रचंड विरोध होतांना पाहायला मिळत आहे. आगामी निवडणुका लक्षात घेता भुजबळांच्या या भूमिकेचा अजित पवार गटाला देखील फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे भुजबळ घेत असलेल्या भुमिकेमुळे अजित पवारांची अडचण वाढली असल्याची देखील चर्चा आहे.

## वंचितचा महाविकास आघाडीत समावेश झालेला नाही;...

समाविष्ट करून घ्यायचं असेल तर काँग्रेसच्या वरच्या नेतृत्वाने (दिल्लीतलं हायकमांड) मान्यता दिली पाहिजे. हायकमांडने तशी मान्यता दिली आहे की नाही, हे अद्याप आम्हाला माहिती नाही.

वंचितचे प्रमुख म्हणाले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आमच्याशी पत्रव्यवहार करतात. परंतु, वंचितच्या मविआतील समावेशाबाबतचा निर्णय काँग्रेस नेते अशोक चव्हाण आणि बाळासाहेब थोरात घेतील, असं आम्हाला समजलं आहे. ज्या पत्रकाबद्दल सध्या चर्चा चालू आहे त्यावर केवळ नाना पटोले यांची सही आहे. त्यावर थोरात आणि चव्हाण यांची सही नाही असे ते म्हणाले.

## राहुल गांधींच्या कारवर दगडफेक

बिहारमधून पश्चिम बंगालमध्ये दाखल होत असताना मालदाच्या हरिश्चंद्रपूरमध्ये हा हल्ला झाल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी राहुल गांधी यांच्या गाडीच्या काचा फोडण्यात आल्या. बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूलमधील संबंध बिघडले असताना हा हल्ला झाला. त्यामुळे आता राजकारण तापले आहे.


**कार्यालय नगर परिषद वैजापूर, जि.छ.संभाजीनगर**

**दुरध्वनी क्र. ०२४३६-२२३१४५**

**E-Mail ID: npvaijapur@gmail.com / coud.vaijapur@maharashtra.gov.in**

जा.क्र./न.प.वै/कावि-४/२०२४/१८१ दिनांक : ३१/०१/२०२४

**जाहिर लिलाव प्रगटन**

वैजापूर शहरातील सर्व नागरिकांना व्यापारी वर्ग यांना जाहिर आवाहन करण्यात येते कि, वैजापूर नगर परिषदेने लाडगाव रोड पाण्याच्या टाकी जवळ गाळा क्र. २,३,५,६ चा जाहीर लिलाव दि.०८/०२/२०२४ रोजी १२:३० वाजता नगर परिषद सभागृहात ठेवण्यात आलेला आहे. लिलावाचे नियम अटी कर विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

**स्वाक्षरीत/ -**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**